अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 01 ऑक्टोबर 2026 | वर्ष 12 वे | अंक 08 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरी तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करा

### काँग्रेस, भाजपसह वंचित बहुजन आघाडीची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात यावर्षी पावसाचे प्रमाण, पावसाचे असमान वितरण तसेच पावसातील खंड यामुळे शेती व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. अनेक भागामध्ये पिकांची वाढ खुंटली असून पिकांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

नुकतीच शासनाने दुष्काळग्रस्त तालुक्यांची यादी जाहिर केली आहे. मात्र, या यादीमध्ये ब्रम्हपुरी तालुक्याचा समावेश करण्यात आलेला नाही. बम्हपुरी तालुक्यातील सद्यस्थितीचा विचार करता हा निर्णय शेतकरी व नागरिकांसाठी चिंताजनक आहे. त्यामुळे ब्रम्हपुरी तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यात यावा. यासाठी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस चे अध्यक्ष खेमराज तिडके व वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते प्रेमलाल मेश्राम यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केलेला आहे. सोबतच माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ब्रम्हपुरी तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्याची मागणी केली आहे. दुष्काळग्रस्त तालुका म्हणून समावेश झाल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या विविध मदत व सवलतींचा लाभ मिळण्यास मदत होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे ब्रम्हपुरी तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत तातडीने समावेश करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार तातडीने आर्थिक मदत व आवश्यक सवलती द्याव्यात. शेतकऱ्यांना पीकविमा, कर्ज व इतर शासकीय योजनांचा तातडीने लाभ मिळवून द्यावा. ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. यासाठी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीद्वारे निवेदन देण्यात आले तर प्रा. देशकर यांनी प्रत्यक्ष फोनवर मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला.

माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र पाठवून ब्रम्हपुरी तालुक्यातील प्रत्यक्ष परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच त्यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या सोबत दूरध्वनीवरून चर्चा करून तालुक्यात कमी पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती, पिकांचे झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांच्या अडचणी याबाबत सविस्तर माहिती दिली.

## झाडीबोलीतून डिजिटल जगतावर अधिराज्य गाजविणारी "हौशी"

ब्रम्हपुरी/ महेश पिलारे

ग्रामीण भागातील विद्यार्थी हे अत्यंत प्रतिभासंपन्न असतात. त्यांना आपल्यातील कला आणि कौशल्य सादर करण्यासाठी योग्य संधी मिळाली, तर ते त्या संधीचे सोने केल्याशिवाय राहत नाहीत. याचेच एक उत्तम उदाहरण नुकतेच पाहायला मिळाले आहे. 'कोळशाच्या खाणीत हिरा सापडतो' या उक्तीप्रमाणे, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत शिक्षणासोबतच आपल्या अंगातील कला डिजिटल प्लॅटफॉर्मवर सादर करून अल्पावधीतच स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे, ती ब्रम्हपुरी तालुक्यातील खरकाडा येथील एका हौशी कलाकाराने! खरकाडा गावात 'हौशी' या नावाने प्रचलित असलेल्या, एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या स्नेहा सोमेश्वर ठाकरे हिची ही प्रेरणादायी गोष्ट आहे.



माणसाच्या अंगात एखादी कला असली की ती त्याला स्वस्थ बसू देत नाही. 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' या उक्तीप्रमाणे, स्नेहा हिला लहानपणापासूनच रंगमंचावर नाटक, वेशभूषा आणि कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करण्याची आवड होती. बालवयातील शिक्षणापासून ते माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत शाळेने तिला व्यासपीठ निर्माण करून दिले. परंतु, शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रम वर्षातून एकदाच होत असल्याने, आपली कला लोकांसमोर नियमित सादर करण्यासाठी एखादा चांगला रंगमंच मिळावा यासाठी ती धडपडत होती.

म्हणतात ना, 'शोधले तर देवही सापडतो'; तसेच काहीसे स्नेहाच्या बाबतीत घडले. तिची कला सादर करण्यासाठी तिला इन्स्टाग्राम, यूट्यूब आणि फेसबुक यांसारखे डिजिटल प्लॅटफॉर्म मिळाले. शेतकरी कुटुंबातील वातावरणामुळे स्थानिक झाडीबोली भाषा तिच्या सहज वळणी आली होती. तिने या झाडीबोली भाषेतील कॉमेडी

(उर्वरित पान क्र. ५ वर)

## कांचन पांडे ब्रम्हपुरीचे ठाणेदार म्हणून रुजू

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा पोलीस दलात सोमवारी (२८ सप्टेंबर) प्रशासकीय आणि विनंतीवरून बदल्यांचे मोठे आदेश धडकले. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या या यादीमुळे जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी बदलले असून, आता पोलीस वर्तुळात नव्या नियुक्त्यांचीच चर्चा रंगली आहे.



ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद बानबले यांची गडचांदूर येथे बदली तर सिंदेवाही येथून पोलीस निरीक्षक कांचन पांडे यांची आता ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी वर्णी लागली आहे.

नव्या ठाणेदारांच्या आगमनामुळे पोलीस ठाण्याच्या कारभारात काय नवे बदल दिसतात, याकडे आता स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.



## संपादकीय...

# हवे वास्तववादी अर्थकारण!

महाराष्ट्रासमोर सध्या एकीकडे लोकानुनयी योजनांचा प्रचंड आर्थिक भार आणि दुसरीकडे राज्यावर गडद होत चाललेले दुष्काळाचे संकट, अशी दुहेरी आव्हाने उभी ठाकली आहेत. राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', शेतकऱ्यांच्या दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी आणि कृषी वीज बिलमाफी यांसारख्या घोषणांची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात घोषित केलेल्या या शेतकरी कर्जमाफीसाठी जवळपास ४० हजार कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. याशिवाय, कृषी वीजबिल माफीचा ४८ हजार कोटी रुपयांचा भारदेखील सरकारवर आहे. या कल्याणकारी योजनांमुळे आधीच त्रस्त असलेल्या सरकारी तिजोरीवर आता दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. सध्याच्या आर्थिक स्थितीचे चित्र अत्यंत चिंताजनक आहे. चालू आर्थिक वर्षात सुमारे ४० हजार ५५२ कोटी रुपयांची महसुली तूट, तब्बल १ लाख ५० हजार कोटी रुपयांची राजकोषीय तूट आणि राज्यावरील ११ लाख कोटी रुपयांच्या कर्जाचा डोंगर यामुळे शासनाची आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे. या प्रचंड कर्जावर केवळ व्याज म्हणून राज्याला वार्षिक ७० हजार कोटी रुपये चुकावावे लागत आहेत. त्यातच विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या तब्बल ९७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आणि आगामी काळात नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळयाच्या तयारीसाठी लागणारा मोठा निधी यामुळे शासनाच्या तिजोरीत सद्यस्थितीत खडखडाट आहे. परिणामी, दुष्काळग्रस्तांना तातडीने मदतीचा हात देण्यासाठी सरकारकडे पुरेसा निधी उरलेला नाही.

केंद्र सरकारने चालू आर्थिक वर्षात महाराष्ट्राला १ लाख २० हजार कोटी रुपयांपर्यंत कर्ज उभारण्याची परवानगी दिली असून, त्यापैकी गेल्या पाच महिन्यांतच सुमारे ५० हजार कोटींचे कर्ज सरकारने उचलले आहे. मदत आणि पुनर्वसन विभागाकडून दुष्काळग्रस्त भागांचे सर्वेक्षण अजून सुरू असून, त्याचे अहवाल आल्यानंतरच मदतीसाठी नेमकी किती रक्कम लागेल हे स्पष्ट होईल. यासाठी आणखी कर्ज काढावे लागणार आहे. एकीकडे दुष्काळाचे भीषण संकट तोंडास आले असताना आणि दुसरीकडे नाशिक कुंभमेळयाच्या निधीला कोणताही धक्का लावणार नाही अशी भूमिका शासनाने घेतली आहे, ज्यामुळे प्राधान्यक्रमांच्या मुद्द्यावर नवीन चर्चा सुरू झाली आहे. आपत्कालीन परिस्थितीत शासकीय यंत्रणा कशा प्रकारे निधीचे व्यवस्थापन करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. लोकप्रिय घोषणा आणि विकासात्मक प्राथमिकता यांच्यात योग्य समतोल न साधल्यास राज्याची आर्थिक स्थिती दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचू शकते. कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक असले, तरी राज्याचा राजकोषीय ताळेबंद धोक्यात आल्यास त्याचे दूरगामी दुष्परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतात. कर्जबाजारीपणामुळे राज्याच्या विकासासाठी आणि पायाभूत सुविधांसाठी मिळणारा निधी आक्रसतो.

जेव्हा राज्याचा मोठा हिस्सा केवळ जुनी कर्जे आणि कर्जावरील व्याज फेडण्यात खर्च होतो, तेव्हा भविष्यातील पिढ्यांवर आर्थिक गुलामगिरीचा बोजा अप्रत्यक्षपणे लादला जातो. आज घेतलेली कर्जे जर संपत्ती निर्मिती किंवा शाश्वत उत्पादक प्रकल्पांऐवजी केवळ अनुनयी योजना आणि अनुदानांवर खर्च होत राहिली, तर राज्याची आर्थिक स्वायत्तता आणि विकासात्मक वेग कायमचा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. लोकानुनयी राजकारण आणि वास्तववादी अर्थकारण यांच्यातील ही दरी भविष्यात राज्याला अत्यंत महागात पडू शकते. त्यामुळे केवळ तात्कालिक लोकप्रियतेचा विचार न करता, राज्याच्या दीर्घकालीन आर्थिक आरोग्यासाठी धोरणात्मक आत्मपरीक्षण करण्याची आणि जनतेच्या कल्याणासोबतच वित्तीय स्थैर्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याची हीच खरी वेळ आहे, अन्यथा विकासाचा डोलारा कोलमडण्यास वेळ लागणार नाही. सर्व सोंग आणता येतात, परंतु पैशाचे सोंग काही वठवता येत नाही हे जरी खरे असले तरी सध्याचे लोकानुनयी राजकारण हे वास्तववादी अर्थकारणाकडे कानाडोळा करीत आहे. 'होऊ दे खर्च' ही परिस्थिती काही राज्याच्या हिताची नाही.

# 'कम्युनिकेशन स्किल्स' पुस्तकातून राज्यस्तरावर भरारी

## ने.हि. गर्ल्स हायस्कुलच्या सहा. शिक्षिकेचा शाळेद्वारे गौरव



ब्रम्हपुरी/का.प्र.

एन. एच. गर्ल्स हायस्कूल, ब्रह्मपुरी येथील सहाय्यक शिक्षिका कु. संध्या जयदेव बनसोड यांनी इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थिनींसाठी 'Communication Skills' (संवाद कौशल्य) या विषयावर तयार केलेल्या पुस्तकाची 'ग्रंथालय निर्मिती स्पर्धे'अंतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय साहित्यनिर्मितीमुळे शाळेच्या शैक्षणिक आणि साहित्यिक कार्याला नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संवादकौशल्य अत्यंत महत्त्वाचे असून, विद्यार्थिनींमध्ये प्रभावी संवाद, आत्मविश्वास, विचार मांडण्याची क्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने संध्या बनसोड यांनी हे पुस्तक तयार केले आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत गटशिक्षणाधिकारी डॉ. विद्या शेळके मॅडम, कपिल गणवीर तसेच रामटेकचे संबंधित मान्यवर यांनी शाळेला भेट देऊन संध्या बनसोड यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी मुख्याध्यापिका बनपुरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर तसेच पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी मान्यवरांनी संध्या बनसोड यांच्या शैक्षणिक व साहित्यिक योगदानाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशामागे पती डॉ. आनंद ठीकरे, वडील जयदेव बनसोड, आई, मलगी अधिरा, भाऊ, बहीण तसेच संस्थेचे सचिव अशोक भैया साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणाऱ्या या पुस्तकाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झालेली निवड ही संध्या बनसोड यांच्या कार्याची विशेष दखल घेतली असून, त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रस्ते नागरिकांसाठी; मोकाट जनावरांसाठी नाहीत

## नगर परिषदेच्या धडक कारवाईत १६ मोकाट जनावरे ताब्यात

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी मोकाट जनावरांमुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षिततेचा प्रश्न उद्भवतो. पशुपालकांच्या निष्काळजीपणाचा त्रास नागरिकांनी सहन करणे अपेक्षित नाही. जनावरांची




अडथळयांना आळा घालण्यासाठी नगर परिषद ब्रम्हपुरीमार्फत धडक कारवाई करीत १६ मोकाट जनावरे ताब्यात घेण्यात आली. नागरिकांची सुरक्षितता, वाहतुकीतील शिस्त आणि सार्वजनिक स्वच्छता यांना प्राधान्य देत ही कारवाई करण्यात आली.

जनावरे रस्त्यांवर मोकाट सोडल्यामुळे वाहनचालक, पादचारी, शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. अपघाताचा धोका निर्माण होण्यासोबतच जनावरांच्याही देखभाल व सुरक्षित बंदोबस्त करणे ही संबंधित मालकांची जबाबदारी आहे.

सर्व पशुपालकांनी आपली जनावरे स्वतःच्या जागेत सुरक्षित ठेवावीत. रस्ते, चौक, बाजारपेठा व सार्वजनिक परिसरात जनावरे मोकाट सोडू नयेत. या सूचनेची गांभीर्याने दखल घ्यावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नगर परिषद प्रशासनाने दिला आहे.

शहरातील सार्वजनिक सुरक्षितता, स्वच्छता व शिस्त अबाधित राखण्यासाठी पशुपालकांनी आपली जबाबदारी पार पाडावी आणि नागरिकांनी नगर परिषद प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांनी केले आहे.

**जल है तो कल है...**

## विनोदिनी

बायको सिरीयल बघत होती. कुकरच्या तीन शिट्ट्यांचा आवाज ऐकून नवऱ्याने धावत जाऊन कुकरचा गॅस बंद केला.

बायको : आत जाऊन काय केलंत...?

नवरा : तू सिरीयल बघत होतीस. तुला उठायला लागू नये म्हणून कुकरचा गॅस बंद केला...

बायको : तीन पेग ऑलरेडी झाले आहेत. आता चौथा भरायचा नाही.

नवरा : अग,पण त्याचा काय संबंध..?

बायको : तीन शिट्ट्या शेजारच्या घरात झाल्या. आपल्या गॅसवर काहीही ठेवलेलं नाही. गॅस बंदच होता...!

# वादळामुळे मुडझा येथे कर्मवीर विद्यालयाच्या छताचा भाग कोसळला

## जीर्ण इमारतीमुळे विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला, जीवितहानी नाही

ब्रह्मपुरी/का.प्र.

ज्या शाळेत आपण आपल्या मुलांना मोठ्या आशेने, सुरक्षित भविष्यासाठी पाठवतो, तीच शाळा जर त्यांच्या जिवावर उठली तर? असाच एक अंगावर काटा आणणारा प्रकार ब्रम्हपुरी तालुक्यातील मुडझा येथे घडला.



झाले असे की, काल २३ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास मुडझा भागात अचानक वाऱ्यासह धुवांधार पाऊस सुरू झाला. या मुसळधार पावसामुळे येथील 'कै. भिवाजी चत्रे शिक्षण संस्था नागभीड'ची ब्रह्मपुरी तालुक्यातील मुडझा येथील 'कर्मवीर विद्यालय तथा कला कनिष्ठ महाविद्यालय' या शाळेच्या इमारतीचे छत भसाभसा खाली कोसळले. दैव बळवत्तर म्हणून, छताचा भाग पत्त्यांसारखा कोसळला, त्यावेळी वर्गात मुले नव्हती! नाहीतर काय अनर्थ घडला असता, विचार करूनही अंगावर काटा येतो. एखादी मोठी दुर्घटना घडली असती आणि निष्पाप मुलांचा जीव गेला असता. पण प्रश्न असा उपस्थित होतो की, प्रशासनाला प्रत्येक वेळी अशाच एखाद्या मोठ्या अपघाताची प्रतीक्षा असते का?

मिळालेल्या माहितीनुसार, कर्मवीर विद्यालयाची ही इमारत सन १९६९ मध्ये बांधण्यात आली आहे. सदर इमारतीत ५ ते १२ वी पर्यंत शाळा आहे. आज तब्बल ५७ वर्षे झाली, तरी या जीर्ण इमारतीत शाळा भरवली जात आहे. 'इमारत अत्यंत धोकादायक झाली आहे, ती कधीही कोसळू शकते,' अशी पूर्वकल्पना स्थानिक नागरिकांनी आणि पालकांनी शाळा प्रशासनाला एक-दोनदा नव्हे, तर वारंवार दिली होती. पण, दुर्दैवाची गोष्ट म्हणजे शाळेचे संस्थाचालक, प्राचार्य आणि शाळा व्यवस्थापन समिती या सगळ्यांनी पालकांच्या या गंभीर इशाऱ्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. डोळ्यांवर झापडे ओढून बसलेल्या या प्रशासनाला जणू काही घडणारच नाही असा आव आणायचा होता.

इतक्या मोठ्या धक्कादायक घटना घडल्यानंतरही शाळा प्रशासनाकडून कोणतीही ठोस हालचाल झालेली नाही. प्रशासनाची ही थंड आणि 'बघ्याची' भूमिका पाहून मुडझ्यातील गावकऱ्यांचा आणि पालकांचा संताप आता अनावर झाला आहे. 'आम्ही आमची मुले शिकून मोठी व्हावीत म्हणून शाळेत पाठवतो, की त्यांच्या जिवाला मुकण्यासाठी?' असा थेट आणि संतप्त सवाल आता पालक विचारत आहेत. या अत्यंत धोकादायक आणि जीर्ण इमारतीमध्ये लहान लहान मुलांना बसवणे म्हणजे थेट त्यांच्या जिवाशी खेळ मांडण्यासारखेच आहे.

घटनेच्या वेळी सुदैवाने मुले वर्गात नव्हती, पण भविष्यात जर काही बरे-वाईट झाले तर त्याला जबाबदार कोण? ते संस्थाचालक की डोळे मिटून बसलेले प्रशासन? पालकांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे. या इमारतीचे तात्काळ 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्यात यावे, मुलांच्या शिक्षणासाठी ताबडतोब पर्यायी आणि सुरक्षित व्यवस्था करावी आणि निष्काळजीपणा करणाऱ्या संस्थाचालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, हीच आता संपूर्ण मुडझावासीयांची एकमुखी मागणी आहे. दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी थेट आपला मोर्चा शाळेकडे वळवून प्राचार्य तथा शिक्षकांना जाब विचारला. घटनास्थळी गट शिक्षणाधिकारी विद्या शेळके यांनी भेट दिली असून निर्लेखीकरणचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविणार असल्याचे आमच्या प्रतिनिधीला सांगितले. घटना घडल्यानंतर एक दिवसाचा कालावधी लोटून सुद्धा संस्था चालकाने साधी भेट सुद्धा घेतली नाही. त्यामुळे पालकात आणि नागरिकांत संस्था चालकाविरोधात रोष व्यक्त करण्यात येत आहे.

# डॉ. खानोरकरांच्या 'संजोरी'ला वाङ:मय पुरस्कार

ब्रह्मपुरी/का.प्र.



जिल्हातील ब्रह्मपुरी येथील प्रसिद्ध कवी, लेखक, वक्ते, पत्रकार तथा ३३ व्या झाडी बोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष,नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ.धनराज लक्ष्मण खानोरकर यांच्या बहुचर्चित 'संजोरी' ग्रंथाला २०२५ चा अतिशय प्रतिष्ठेचा समजला जाणारा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा सोलापूरचा राज्यस्तरीय स्व.डॉ. मधुकर कृष्णाजी झांबरे स्मृती साहित्य पुरस्कार घोषित झालेला आहे.

पुरस्काराचे स्वरुप आकर्षक सन्मानचिन्ह, रोख रक्कम, सन्मानपत्र, शाल असे राहणार असून ०४ ऑक्टो.२०२६ ला सोलापूरला मान्यवरांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल. 'संजोरी' ग्रंथ हा गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या बी.ए. द्वितीयच्या अभ्याक्रमात असून झाडी बोलीतील लोककला, लोकजीवन आणि लोकसंस्कृतीवरचे त्यांनी यात उत्कृष्ट ललित लेखन केले आहे. संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही ग्रंथातील पाठ समाविष्ट आहेत, हे विशेष.

डॉ.खानोरकरांचे पाच काव्यसंग्रह प्रकाशित असून तीन संपादित व एक ललितग्रंथ प्रकाशित आहे. 'माझी पत्रकारिता' ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर असून अनेक वृत्तपत्रांतून त्यांनी स्तंभलेखनही केलेले आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक पत्रकार, प्राध्यापक, कवी, लेखक व मित्रमंडळींनी डॉ खानोरकरांचे भरभरुन अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मारोतरावजी कांबळे यांचा प्रथम स्मृतिदिन

ब्रह्मपुरी/का.प्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था चांदा, ब्रह्मपुरीचे संस्थापक सचिव शिक्षणमहर्षी स्मृतिशेष मारोतरावजी कांबळे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त संस्थेच्या वतीने ब्रह्मपुरी पब्लिक स्कूलच्या सभागृहात श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संस्थेचे सचिव तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, ब्रह्मपुरीचे प्राचार्य डॉ. देवेश कांबळे, संस्थेच्या सदस्या तथा ब्रह्मपुरी पब्लिक स्कूलच्या प्राचार्या रिमा कांबळे, संस्थेच्या सदस्या तथा महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. स्निग्धा कांबळे यांच्यासह संस्थेद्वारे संचालित विविध आस्थापनांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

❁❁❁❁❁❁❁❁

# दुष्काळग्रस्त यादीत ब्रम्हपुरीचा समावेश करा

## - प्रा. प्रकाश बगमारे

ब्रह्मपुरी/का.प्र.

राज्य शासनाने खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला. मात्र या यादीत ब्रह्मपुरी तालुक्याचा समावेश करण्यात आलेला नाही. ब्रह्मपुरी तालुक्यात यंदा कमी पावसामुळे शेत पिकावर गंभीर परिणाम झाला असून शेतकरी अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाचे नेते प्रा प्रकाश बगमारे यांनी पालकमंत्री प्रा.डॉ. अशोक ऊइके यांचेकडे ब्रह्मपुरी तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यासाठी शिफारस करावी, अशी मागणी केली आहे.

ब्रह्मपुरी तालुक्यात पावसाचे प्रमाण जरी समाधानकारक दाखविले असले तरी अनेक असे भाग आहेत की जिथे मात्र पाण्याचा तुटवडा पडत आहे आणि त्यामुळे पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांना अनेक अडचणींना मात करावी लागत आहे. यासाठी शेतकरी सरकारच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले आहेत. ब्रह्मपुरी तालुक्यातून गोसीखुर्द चा मुख्य कालवा गेलेला आहे परंतु ब्रह्मपुरीकरांची अवस्था 'उशाला पाणी आणि घशाला कोरड' अशी झालेली आहे. अगदी पेरणीपासूनच शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. आणि यामुळे किडींचा प्रादुर्भाव देखील वाढत असून वाढत्या खर्चामुळे आधीच शेतकरी हवालदिल झालेला असताना जर त्यांना नुकसान भरभरपाई मिळाली नाही तर त्याचे गंभीर परिणाम शेतकऱ्यांच्या कुटुंबाला भोगावे लागणार आहेत.

म्हणून या तालुक्याच्या भौगोलिक रचनेचा विचार करून ब्रह्मपुरी तालुक्याला तात्काळ दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यासाठी पाठपुरावा करावा म्हणून प्रा प्रकाश बगमारे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने राज्य सरकारकडे विनंती केली आहे.

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालयात किशोरवयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे 'किशोरवयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन' कार्यक्रम प्राचार्य के. एम. नाईक यांचे अध्यक्षतेत व उपप्राचार्य ए. डब्ल्यू. नागाडे, व्ही. एन.वदनलवार, जे.पी.पराते यांचे प्रमुख उपस्थितीत नुकतेच संपन्न झाले.



कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या प्राजक्ता देवगडे, समुपदेशक, उपजिल्हा रुग्णालय, ब्रम्हपुरी यांनी आपल्या मार्गदर्शनात, किशोरवयात होणारे शारीरिक व मानसिक बदल, शरीरातील हिमोग्लोबिनचे महत्व व विशेषत: मुलींनी घ्यावयाची काळजी, पौष्टिक आहार तथा नैसर्गिक प्रोटीन, दुध व दुग्धजन्य पदार्थ इ. चे महत्व सांगताना आरोग्याची काळजी कशी घ्यावी हे समजावून सांगितले. यावेळी त्यांनी पुरुषांमध्ये वाढत जाणारे तोंडाचे कर्करोग, तर स्त्रियांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येणारे स्तनाचे व गर्भाशयाचे कर्करोग याबाबत माहिती देत कर्करोग कसे ओळखावे, त्यांची लक्षणे, तसेच प्रि कॅन्सर अवस्था याबाबत महत्वाची माहिती दिली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात, एचआयव्ही संसर्गाची कारणे व परिणाम सांगतांना ब्रम्हपुरी तालुक्यातील सद्यस्थितीवर भाष्य केले. लग्न करण्यापूर्वी व्यक्तीसाठी सिकलसेल व एचआयव्ही तपासणी किती महत्वाची आहे हे उदाहरणातून स्पष्ट केले.

प्राचार्य के. एम. नाईक यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात, विद्यार्थीनी आपल्या जीवनात व्यसनापासून दुर राहून पुस्तकांशी नाते जोडावे आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी करिअर घडवावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंकज बेंदेवार यांनी केले. कार्यक्रमाला असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रा.डॉ. रविंद्र विखार यांच्या पुस्तकाचे विमोचन

ब्रह्मपुरी/का.प्र.

दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वारा संचालित श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.रवींद्र विठोबा विखार यांच्या 'भारतीय सामाजिक विचारवंत' या पुस्तकाचे विमोचन दंडकारण्य संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले .

याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या अतिशय सोप्या भाषेमध्ये व अभ्यासक्रमानुसार सदर पुस्तकाची रचना केलेली आहे. सदर पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक असून बांधणी व टंकलेखन अचूक केलेली आहे.



सदर पुस्तक केवळ बी.ए. अंत्यच्या विद्यार्थ्यांनाच लाभदायक होणार नसून स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना या पुस्तकाचा लाभ होणार आहे असे सांगत डॉ. रविंद्र विखार यांचे अभिनंदन करीत पुढील कार्याला शुभेच्छा दिल्यात.

यापूर्वीही डॉ. रविंद्र विखार यांची अनेक पुस्तके विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या विविध अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारतीपुणे अंतर्गत विविध पुस्तकांचे लेखन व समीक्षण त्यांनी केलेले आहे. विद्यापीठाअंतर्गत बीए समाजशास्त्र विषयाचा अभ्यास करणारे अनेक विद्यार्थी त्यांची पुस्तके अभ्यासत आहेत.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये शहीद भगतसिंग जयंती उत्साहात साजरी



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरातील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुल येथे वीर भगतसिंग जयंती २८ सप्टेंबर २०२६ ला साजरी करण्यात आली. प्रसंगी शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली.

भगतसिंग यांचा जन्म २८ सप्टेंबर १९०७ रोजी बंगा येथे झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी तरूण वयातच सक्रीय सहभाग घेतला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपल्या जीवनाचे बलिदान दिले. यावेळी जोहान शेख वर्ग KG-II तसेच निधीश जंगठे वर्ग ५ Mercury विद्यार्थ्यांनी भगतसिंग यांची वेशभुषा परिधान करून भगतसिंग यांच्या देशभक्तीची आणि स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाची माहिती दिली. त्यांच्या जीवनकार्यातून धैर्य, देशप्रेम आणि त्यागातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. आसावरी बागडे वर्ग ६ वा अ या विद्यार्थीनीने स्वांतत्र्य सैनिकांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन कंथक नागदेवते वर्ग ५ Mercury च्या विद्यार्थ्याने केले. कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून एल. एम. बी. पब्लिक स्कुलचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांचेसह शाळेतील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# नाटक हे नवख्या कलाकारांना घडविण्याचे प्रभावी माध्यम - डॉ. बालपांडे

ब्रह्मपुरी/का.प्र.

'नाटक हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून गाव-खेड्यातील नवख्या कलाकारांना घडवण्याचे एक उत्कृष्ट आणि प्रभावी माध्यम आहे. गाव-खेड्यातूनच खऱ्या अर्थाने दर्जेदार कलाकार निर्माण होत असतात,' असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा ब्रह्मपुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. गोकुळदास बालपांडे यांनी केले.

ब्रह्मपुरी तालुक्यातील खरकाडा (रनमोचन) येथे 'नवनिर्माण सार्वजनिक गणेश मंडळ' आयोजित 'पंख तुटलेले माझे' या झाडीपट्टीतील नाटकाच्या उद्घाटन प्रसंगी ते मुख्य उद्घाटक म्हणून बोलत होते. गावातील कलाकारांना जेव्हा आपल्याच गावात पहिल्यांदा अभिनय करण्याची संधी मिळते, तेव्हा त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळून उत्कृष्ट कलाकार घडतात, यावर डॉ. बालपांडे यांनी भर दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी सरपंच रवींद्र ढोरे यांनी भूषवले. प्रसंगी प्रसिद्ध विनोदी नाट्य कलावंत 'हास्यसम्राट' दुधराम कावळे यांचा मंडळाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी लक्ष्मण मेश्राम यांनी मंडळाच्या उपक्रमांचे कौतुक केले. 'मंडळाने सामाजिक सलोखा जपत गावाच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने कार्य करत राहण्याचे आवाहन केले.

या सोहळ्याला बारा ज्योतिर्लिंग महादेव मंदिराचे सचिव योगेश्वर ढोरे, माजी उपसरपंच तुकाराम ठाकरे, पोलीस पाटील संगिता ढोरे, मनसे तालुकाध्यक्ष ओमप्रकाश सोनटक्के, लक्ष्मण मेश्राम सर, पत्रकार महेश पिलारे, विनोद दोनाडकर, माजी तंटामुक्ती अध्यक्ष हिरामण मुळे यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते. नाट्यप्रयोगाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन उत्तम बगमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोर

# जि.प. माजी शासकीय हायस्कुलच्या शाव्यस अध्यक्षपदी नरेश मंडपे

ब्रम्हपुरी/का.प्र.

जि.प.(माजी शासकीय) हायस्कुल, ब्रम्हपुरी येथे दुर्गादास नाकतोडे यांच्या अध्यक्षतेखाली शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली. यात सर्वानुमते नरेश भिकाजी मंडपे यांची अध्यक्षपदी तर सरस्वती यादव घोरमोडे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

सदस्य म्हणून अविनाश राऊत, अनिल वाळके, विकास कामडी, दुर्गादास नाकतोडे, भारती राऊत, अनिरुद्ध उरकुडे, लक्ष्मी अर्जुनकर, जितसिंग भुराणी, इंदिरा सेडमाके तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून अंबादास सुरपाम, विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून तृषा दोनाडकर तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून साहिल नवनाथ नाकतोडे यांची निवड करण्यात आली.

# शहरातील घनकचरा संकलनासाठी अपुरी वाहन व्यवस्था

## नगरसेवक मनोज भुपाल यांची वाहन संख्या वाढविण्याची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील नागरिकांच्या घराघरातून दररोज ओला व सुका कचरा नियमितपणे संकलित करणे, तसेच शहरातील विविध चौक, बाजारपेठा, रस्ते व सार्वजनिक ठिकाणी जमा होणारा कचरा उचलून तो घनकचरा संकलन/प्रक्रिया केंद्रावर पोहोचविणे ही नगरपरिषदेची अत्यंत महत्त्वाची व नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित सेवा आहे.

मात्र, ब्रह्मपुरी शहराचा विस्तार, लोकसंख्या, वॉर्डांची संख्या आणि दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण लक्षात घेता किमान १२ ते १३ वाहनांची आवश्यकता असल्याचे दिसून येते. त्याच्या तुलनेत सध्या केवळ अंदाजे ५ ते ६ अकार्यक्षम केव्हाही बंद होणारी वाहने उपलब्ध असल्याने जवळपास ६ ते ७,आवश्यकतेनुसार वाहनांची कमतरता असल्याचा मुद्दा मनोज भूपाल यांनी उपस्थित केला आहे.

नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेल्या केवळ ५ ते ६ अकार्यक्षम अनफिट केव्हाही बंद होणाऱ्या वाहनांवरच संपूर्ण शहरातील ओला व सुका कचरा संकलनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, त्यामुळे सर्व भागांमध्ये दररोज नियमितपणे कचरा उचलणे प्रत्यक्षात कठीण झाले आहे व नागरिकांची सातत्याने घरगुती कचरा संकलन करण्या संदर्भात वारंवार तक्रारी येत असल्याचे निदर्शनास येत असून प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले असे दिसते ही गंभीर बाब आहे. कचरा संकलनाची व्यवस्था कागदावर नव्हे तर प्रत्यक्ष क्षमतेनुसार असावी कंत्राटदाराने आवश्यक अतिरिक्त वाहने न . प. ची वाहने येई पर्यंत उपलब्ध करून द्यावीत तसेच सुधारित निविदा प्रसिद्ध करण्याची मागणी मनोज भूपाल यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे केली आहे .

# ब्रम्हपुरी अर्बन को-ऑप बँकेची सर्वसाधारण सभा संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी येथील ब्रम्हपुरी अर्बन को. ऑपरेटिव्ह बँक लि. ची ३० वी वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता विठ्ठल रुख्मीनी सभागृह, ब्रम्हपुरी येथे अतुल देशकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.सर्व संचालकांनी दिप प्रज्वलन व भारतमाता पूजन करुन अहवाल वर्षात दिवंगत शेतकरी बांधव, सैनिक, सभासद खातेदार, हितचिंतक तसेच बँकेचे जेष्ठ संचालक डॉ. विलासजी गजपूरे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश दुब्बावार यांनी सभेचे कामकाज सांभळले. विषयावर चर्चा होऊन ठराव सर्व संमतीने मंजूर करण्यात आले. अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभासदांच्या प्रश्नांचे समर्पक असे उत्तर देऊन यांनी सभासदांची मने जिंकली.आमसभेला अध्यक्ष अतुल देशकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात बँकेच्या उत्तरोत्तर होणाऱ्या उन्नती बद्दल संचालक मंडळ, सभासद व ग्राहक तसेच सर्व कर्मचारी वर्गाचे अभिनंद केले. बँकेच्या उत्तरोत्तर होणाऱ्या प्रगती बाबत प्रयत्नशील राहू अशी मनोकामना व्यक्त केली.आमसभेचे आभार उपाध्यक्ष रविंद्र आष्टेकर यांनी मानले आणि अशा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात बँकेची ३०वी आमसभा संपन्न झाली.

# ०२ ऑक्टोबरला ब्रम्हपुरीत पदयात्रा, जाहीर व्याख्यान व भव्य झांकी स्पर्धा

ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून ब्रम्हपुरी येथे 'राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती महोत्सव समिती'च्या वतीने विविध प्रेरणादायी व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'राष्ट्रपिता महात्मा गांधींचे सत्याग्रह : माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित पदयात्रा, जाहीर व्याख्यान आणि राज्यस्तरीय झाँकी स्पर्धा शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडणार आहेत.

दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता 'महात्मा गांधी पुतळा, बाजार चौक' येथून पदयात्रेला सुरुवात होईल. ही पदयात्रा 'स्व. मदनगोपालजी भैया सभागृह, ने. हि. महाविद्यालय' येथे पोहोचेल. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता स्व. मदनगोपालजी भैया सभागृहात जाहीर व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विजय वडेट्टीवार विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते तथा आमदार, ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र, प्रमुख वक्ते विश्वंभर चौधरी ज्येष्ठ विचारवंत, प्रमुख अतिथी योगेशभाऊ मिसार नगराध्यक्ष, नगर परिषद, ब्रम्हपुरी, रुषीजी राऊत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे ज्येष्ठ काँग्रेस नेते, ब्रम्हपुरी, प्राचार्य डॉ. नामदेव कोकोडे माजी प्राचार्य, ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी आदी. मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर आणि विचारांवर आधारित 'झाँकी स्पर्धे'चे विशेष आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडेल. यात प्रथम पारितोषिक २१,०००/-, द्वितीय पारितोषिक १५,०००/-तृतीय पारितोषिक ११,०००/- तर प्रोत्साहनपर पुरस्कार सहभाग घेणाऱ्या प्रत्येक झाँकीसाठी ?५,०००/- देण्यात येतील. या सर्व कार्यक्रमांचा आणि झाँकी स्पर्धेचा ब्रम्हपुरी व परिसरातील नागरिकांनी सहपरिवार उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन 'राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती महोत्सव समिती, ब्रम्हपुरी' यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ने.हि. महाविद्यालयात 'संशोधनाच्या दिशा' उपक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात पदव्युत्तर विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने 'संशोधनाच्या दिशा'वर चर्चासत्र प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.यात विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर,डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील आचार्य पदवीचे मार्गदर्शक डॉ जगदिश मेश्राम, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, प्रा भारती तुपट,प्रा स्वाती धनविजय इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांना संशोधन पध्दती, संशोधनाच्या दिशा आणि संशोधन विषयाची आवश्यकता यावर मार्गदर्शन करण्यात आले.पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

प्रास्ताविक डॉ धनराज खानोरकर, संचालन डॉ वानखडे तर उपस्थितांचे आभार प्रा तुपटने मानले. संशोधक विद्यार्थ्यांसाठी ही चर्चा लाखमोलाची ठरली.

# झाडीबोलीतून डिजिटल जगतावर...

(पान क्र. ९ वरून)

रील्स, डेली ब्लॉग्स, कॉलेज जीवनातील प्रसंग, प्रवासवर्णने, शेतीविषयीचे ब्लॉग्स आणि कौटुंबिक संवाद डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोड करण्यास सुरुवात केली. विशेष म्हणजे, अवघ्या चार महिन्यांत तिचे इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर प्रत्येकी १४ हजारांहून अधिक फॉलोअर्स झाले असून तिने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिचे इन्स्टाग्राम haushii0 व फेसबुक वर Haushii Funclub या नावाने अकाऊंट आहेत.

स्नेहा सध्या नेवजाबाई हितकारिणी शिक्षण संस्थेच्या ने. हि. महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे बी.कॉम. तृतीय वर्षात शिकत आहे. शिक्षणासोबतच ती आपल्या कलेची आवडही जपत आहे. तिच्या या डिजिटल प्रवासाची दखल घेऊन तिला शॉर्ट फिल्ममध्ये काम करण्याची संधीही मिळाली आहे. स्नेहा स्वतः रील्स तयार करते, तर ब्लॉग्स बनवण्यासाठी तिचे मित्र-मैत्रिणी तिला मदत करतात. शिक्षणासोबतच कलेची जोपासना करत ती विविध दुकानांच्या जाहिरातींच्या माध्यमातून उत्पन्नही मिळवत आहे. सध्या स्नेहाने मोबाईलला केवळ मनोरंजनाचे साधन न ठेवता, त्याला स्वतःच्या स्वावलंबनाचे आणि कमाईचे साधन बनवले आहे. भविष्यात फिल्म इंडस्ट्रीमध्ये काम करायचे असून 'स्टँड-अप कॉमेडियन' बनणे हे आपले ध्येय असल्याचे तिने सांगितले.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

**... QUOTES ...**

"I suppose leadership at one time meant muscles; but today it means getting along with people."

- Mahatma Gandhi

**चारोळी**

आम्ही देशाला लुटतो
तुम्ही परस्परांना लुटा...
आम्ही 'जेब भरो' करतो,
तुम्ही 'जेल भरो' करा...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये दि. १९ सप्टेंबर २०२६ ला वर्ग ३ रा सहाय्यक समुदाय स्पर्धा Community helper competition घेण्यात आली.

'I am your community helper' ही विशेष स्पर्धा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी डॉक्टर, पोलीस, शिक्षक, अग्निशामक, सफाई कामगार आदी सहाय्यकाच्या भूमिका साकारल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना समूदाय सहाय्यकांचे महत्व पटवून देवून समाजकार्य करतांना किती परिश्रम आणि अडचणी येतात व त्या अडचणींना मात करून कशाप्रकारे आपल्याला साह्य करतात यांचे मोलाचे संदेश आपल्या कलागुणातून विद्यार्थ्यांनी दाखविले.

त्याचप्रमाणे दि. २६ सप्टेंबर २०२६ ला 'संत की वाणी उनकी जुबानी' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये वर्ग ४ थी च्या विद्यार्थ्यांनी संताची वाणी (बोलणे) फक्त शब्द नाही तर हा जीवन जगण्याचा मंत्र आहे. तसेच 'देव बघण्यासाठी मंदीरात जाणे गरजेचे नाही तर मन शुद्ध असणे गरजेचे आहे.' विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या वेशभूषेत त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग व विचार सुंदरपणे सादर केले. या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना संताचे कार्य, विचार आणि संस्कार समजून घेण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्पर्धा उत्साहात व सुंदर वातावरणात संपन्न झाली.

कार्यक्रमाप्रसंगी शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य राठी मॅडम व पर्यवेक्षिका झोडे मॅडम उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकाचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचे परिश्रम मोलाचे ठरले.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

# 'अश्रू, पाऊस आणि टाळ्यांच्या गजरात नेवजाबाई भैया हितकारिणी मंडळाच्या बाप्पाला निरोप

ब्रह्मपुरी/का.प्र.

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात, ढोल-ताशांचा गजर आणि भक्तिमय वातावरणात ब्रह्मपुरीतील प्रसिद्ध नेवजाबाई भैया हितकारिणी सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणरायाचे अनंत चतुर्दशीच्या दिवशी अत्यंत थाटामाटात व भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. तब्बल १२ दिवसांच्या पाहुणचारानंतर बाप्पाला निरोप देताना ब्रह्मपुरीकरांचे डोळे पाणावले होते, तर स्वागतासाठी पडणाऱ्या पावसाच्या सरींनी जणू वरूणराजानेही या निरोप समारंभाला हजेरी लावल्याचा भास होत होता.

मंडळाच्या भव्य मंडपातून (शिक्षण संस्थेच्या आवारातून) विसर्जन मिरवणुकीची दिमाखात सुरुवात झाली. ढोल-ताशा पथकाचा कडकडाट, भजनी दिंडीचा भक्तिभाव आणि कार्यकर्त्यांनी साकारलेले आकर्षक देखावे हे या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. ही भव्य मिरवणूक शहरातील प्रमुख मार्ग असलेल्या सम्राट अशोक चौक, रेणुका माता चौक, मर्दानअली चौक आणि बाजार चौक मार्गे पुढे सरकत कोट तलाव येथे पोहोचली. तेथे बाप्पाच्या मूर्तीचे विधिवत व शास्त्रोक्त पद्धतीने विसर्जन करण्यात आले.

या निरोप सोहळ्याला मंडळाचे संचालक तथा प्रथम नगराध्यक्ष अशोक भैया, उद्योजक निलेश मोहता, दुर्गादास मोहता, अजय भट्टड, प्रसिद्ध उद्योजक व माजी नगरसेवक गौरव भैया, यांच्यासह मंडळाचे सर्व संचालक, पदाधिकारी, महिला व बालचमू मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गेल्या १२ दिवसांपासून आनंदमेळावा आणि वैचारिक उपक्रमांनी दुमदुमून गेलेल्या या मंडपातील बाप्पाच्या विसर्जनामुळे लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वच नागरिक भावुक झाले होते. विशेषत: गेल्या १२ दिवसांत बाप्पाशी जोडली गेलेली लहान मुले बाप्पाच्या जाण्याने अत्यंत दुखावली होती. शालेय विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी रस्त्यावर उतरून, नाचत-गाजत आनंद व्यक्त करत बाप्पाकडे पुढील वर्षी लवकर येण्याचे साकडे घातले.

'निरोप घेतो आता आज्ञा असावी, चुकले आमचे काहीं त्याची क्षमा असावी...' या भावनाव्यक्त करणाऱ्या ओळींनी संपूर्ण परिसर गहिवरून गेला होता. शिस्तबद्धता, सामाजिक भान आणि भव्यतेचा संगम साधत नेवजाबाई भैया हितकारिणी गणेश मंडळाने गणेशोत्सव अत्यंत अभूतपूर्व आणि स्मरणीय ठरवला.







(मिरवणुकीदरम्यान बाप्पाची मनमोहक मुर्ती, तलावात विसर्जन करतांना गणेश भक्त तर तिसऱ्या छायाचित्रात झांकीतील कलावंत)

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

बुधवार बंद
दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
Lubi PUMPS-MOTORS
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
Kirloskar
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404